सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २८ जुलै २०१६.

## महानगरपालिका, जिल्हा परिषदांच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी २८ ऑगस्ट २०१६ रोजी मतदान

मुंबई, दि. २८: विविध सात महानगरपालिकांमधील दहा रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी; तसेच विविध जिल्हा परिषदांमधील पाच आणि पंचायत समित्यांमधील चार रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी २८ ऑगस्ट २०१६ रोजी मतदान होणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, महानगरपालिकांमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी २ ते ९ ऑगस्ट २०१६ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे दिली व स्वीकारली जातील. नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याची मुदत १२ ऑगस्ट २०१६ पर्यंत असेल. २८ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ७.३० ते ५.३० या वेळेत मतदान होईल. दुसऱ्या दिवशी २९ ऑगस्ट २०१६ रोजी मतमोजणी होईल.

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी ८ ते १२ ऑगस्ट २०१६ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे दिली व स्वीकारली जातील. नामनिर्देशनासंदर्भात अपील नसलेल्या ठिकाणी २२ ऑगस्ट २०१६; तर अपील नसलेल्या ठिकाणी २४ ऑगस्ट २०१६ पर्यंत नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. २८ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ७.३० ते ५.३० या वेळेत मतदान होईल. दुसऱ्या दिवशी २९ ऑगस्ट २०१६ रोजी मतमोजणी होईल, असेही श्री. सहारिया यांनी सांगितले.

**महानगरपालिकानिहाय रिक्तपदांसाठी पोटनिवडणूक होणारे प्रभाग: औरंगाबाद-** १२ व २१, **नाशिक-** ३६ब व ३५ब, **ठाणे-** ५३अ व ३२अ, **लातूर-** २अ, **परभणी-** १६ब, **अमरावती-** ३२ब आणि **धुळे-** ३४ब.

**जिल्हापरिषदनिहाय रिक्तपदांसाठी पोटनिवडणूक होणारे निवडणूक विभाग (कंसात तालुका): सातारा-** नागठाणे (सातारा), **सोलापूर-** टेंभूर्णा(माढा), **नंदुरबार-** रोषमाळ बु, (अक्राणी), **अकोला-** हातगाव (मूर्तिजापूर) आणि **गडचिरोली-** कढोली सावलखेडा (कुरखेडा).

**पंचायत समितीनिहाय रिक्तपदांसाठी पोटनिवडणूक होणाऱ्या निर्वाचक गणाचे नाव (कंसात जिल्हा): हवेली (पुणे)-** खेड, **कडेगाव (सांगली)-** कडेपूर, **लातूर (लातूर)-** गातेगाव आणि **जाफ्राबाद (जालना)-** हिवरा बळी.

0-0-0